## प्रेम

प्रेम म्हणजे वेग बेभान
कि ठेहरावी सुरेल तान ?

प्रेम म्हणजे नव-नूतन
का असावे भाव-जतन?

प्रेम म्हणजे मनसोक्त यौवन
कि विसरावे विरक्त मन ?

प्रेम म्हणजे तप्त हवन
का लेपावे शीतल चंदन?

प्रेम म्हणजे अमिट गोंदण
कि हलावे अलगद काकण ?

प्रेम म्हणजे फक्त चुंबन
कि न दिसणार हृदय-स्पंदन ?

प्रेम म्हणजे मुक्त आलिंगन
कि असावे निमूट बंधन ?

प्रेम म्हणजे एकच क्षण
का पाळावे जन्म-वचन ?

प्रेम म्हणजे नित्य चिंतन
कि जपावे मैत्र-चिरंतन ?

**------संध्या रानडे**